
# एका जनार्दनी

१२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू. प्रवास
सं. क्र. ५००



REFBK-0015050

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ-माला : ४

# एका जनार्दनी

## नाथांचें पैठण

भूवैकुंठ प्रतिष्ठानीं। शांतिसुखाचे सिंहासनीं।
साधनसंपन्न निर्जरगणीं। जी अनुदिनीं सुपूज्य॥

— कृष्णदयार्णव

रामचंद्र चिंतामण ढेरे

किंमत
६०
पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७

REFBK-0015050



वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

श्री . ११ . ३ [ ७–६५ ]

© १९५८

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि , मुंबई २

■

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन-माला १६

■

आवृत्ति तिसरी
शके १८८७; सन १९६५

■

किंमत ६० पैसे

■

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

■

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि.करिता
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

■

मुद्रक :


जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणें २

## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रांचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि; त्या त्या स्थानातील महत्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळांचीं सुरेख विश्वसनीय चित्रें, तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम याची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें

या पुस्तकातील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी माहिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल

- मोठा, जाड टाइप, सोपी भाषा; आकर्षक मांडणी
- हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रातील तीर्थ-यात्रा आणि संतदर्शनें; भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाश्यानाहि मार्गदर्शक शालेय सांस्कृतिक कार्यक्रमाना अति उपयुक्त
- **डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबई-राज्य-कडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस.**
- **लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरांसाठीं पुरस्कृत.**
- **असिस्टंट क्यूरेटर ऑफ लायब्ररीज, महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेली.**




दा. क्र. १५०५०

## नाथांचें पैठण :

महाराष्ट्रांतील भागवतधर्माच्या इतिहासांत नवीं तीर्थें आणि नवीं श्रद्धाकेंद्रें निर्माण झालीं. ज्ञानेश्वरांच्या काळीं वारकरी संप्रदायाच्या ध्वजाखालीं महाराष्ट्रांतील सर्व जाती-जमाती अभेदभावानें एकत्र आल्या आणि विठ्ठलनामाच्या गजरानें त्यांनीं महाराष्ट्राला जागवलें. याच काळांत या नव्या शक्तीला प्रतिबंध घालणारी, कर्मकांडाचा पसारा माजवणारी आणि धर्मशास्त्रांतील शब्दपांडित्यानें हृदयधर्माला चिरडूं पाहणारी कर्मठ वृत्ति पैठणला नांदत होती. त्या काळीं पैठण हें उभ्या महाराष्ट्राचें धर्मपीठ म्हणून प्रसिद्ध होतें; परंतु तेथील धर्माचार्य धर्माचा आत्माच हिरावून बसले होते. त्याचमुळें ज्ञानेश्वर-नामदेवादि संतांनीं त्या धर्माचार्यांच्या पाषाणहृदयाला हांक देत न बसतां पंढरीला नवें भक्तिपीठ उभारलें आणि चंद्रभागेच्या वाळवंटांत ज्ञानाची पाणपोई उघडली.

जणुं हें पैठणचें पाप धुऊन काढण्यासाठींच ज्ञानेश्वरांनंतर तीनशें वर्षांनीं पैठणला संत एकनाथांचा अवतार झाला आणि

त्यापूर्वी दोन हजार वर्षांची सांस्कृतिक परंपरा असलेलें पैठण तेथून पुढें ' नाथांचें पैठण ' म्हणून ओळखलें जाऊं लागलें.

**' सा रम्या नगरी '.**

प्राचीन काळीं 'प्रतिष्ठान' या गौरवशाली नांवानें ओळखलें जाणारें हें नगर औरंगाबाद जिल्ह्यांतील पैठण तालुक्यांत गोदावरीच्या कांठीं वसलेलें आहे. या नगरामागें अडीच हजार वर्षांची सांस्कृतिक परंपरा उभी असून, मानवपूर्व अवस्थेंतील आदिमानवाचे अवशेषहि पैठणच्या परिसरांत मिळाले आहेत. याचा अर्थ असा कीं, दक्षिणापथांतील ही गोदाकांठची भूमि आर्यांच्या आगमनापूर्वींहि हजारों वर्षं मानवाच्या प्रगतीच्या धडपडी न्याहाळीत होती. या भूमीच्या गर्भांत अजूनहि तीं विकसनशील मानवाचीं पदचिन्हें सुरक्षित आहेत. पैठणजवळ मुंगी येथें झालेल्या उत्खननांत मानवपूर्व अवस्थेंतील आदि मानवांचीं दगडी हत्यारें आणि इतरहि अवशेष सांपडले आहेत.

पैठणची भौगोलिक रचनाच अशी आहे कीं, त्याला आपोआपच राजधानीचें स्वरूप प्राप्त व्हावें. उत्तरेकडून दक्षिणापथांत प्रवेश केल्यावर पठारावर मध्यभागीं, जलसंपन्न नदीच्या तीरावर, सस्यश्यामल वैभवानें युक्त असें हें स्थान स्वाभाविकच मानवाच्या कर्तृत्वाचें क्रीडास्थान बनलें.

इतिहास-पूर्व काळांतील अवशेष सोडले तर पैठणचा सर्वांत जुना उल्लेख बौद्धांच्या 'सुत्तनिपात' या ग्रंथांत आढळतो. तेथें या नगराला ' पोतण नगर ' असें म्हटलें असून तीं 'अस्सक' ( अश्मक ) देशाची राजधानी आहे, असें म्हटलें आहे. पैठणच्या परिसरांतील भूमीला इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून अश्मक असें नांव होतें. अशोकाच्या शिलालेखांत पैठणच्या नागरिकांचा

'पैतनिक' असा उल्लेख आहे. सांचीच्या प्रसिद्ध स्तूपावरील कोरीव लेखांतहि पैठणवासियांचे उल्लेख आहेत. इ. स. ६० च्या सुमारास पेरिप्लुस नांवाच्या ग्रीक माणसानें लिहिलेल्या ग्रंथांत पैठणच्या निर्यात-व्यापाराचें महत्त्व गायिलें आहे. तो म्हणतो :

> " दक्षिण देशांत फक्त दोनच शहरें व्यापारी दृष्टीनें फार महत्त्वाचीं आहेत : एक पैठण व दुसरें नगर. पैठणाहून भडोचमार्गें गोमेद या रत्नांची निर्यात होते. तेथें नाना-प्रकारचें कापडहि तयार होतें. "

यावरून एक व्यापाराचें केंद्र म्हणून पैठणचा इतिहास किती जुना आहे, याची कल्पना येईल. पैठणच्या पैठण्या तर प्रसिद्धच आहेत.

अशोकाच्या निधनानंतर लौकरच महाराष्ट्रांत सातवाहन नांवाचें राजकुल उदयास आलें आणि त्या कुलानें महाराष्ट्रांत विस्तृत व बलाढ्य साम्राज्य स्थापन केलें. या घराण्याचें राज्य केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर गुजराथ, काठेवाड, माळवा, आंध्र आणि कर्नाटक एवढ्या विशाल भूभागावर पसरलें होतें. या कुलां-तील राजांना 'त्रिसमुद्राधिपति' ( तीन समुद्रांचे अधिपति ) असें बिरुद होतें. एवढ्या मोठ्या साम्राज्याची राजधानी प्रतिष्ठान ही होती. त्यामुळें स्वाभाविकच सातवाहनांच्या काळांत प्रतिष्ठान वैभवाच्या गौरीशंकरावर उभें होतें. या काळांत प्रतिष्ठानच्या परिसरांत हिंदु मंदिरें व बौद्ध विहार निर्माण झाले आणि संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषांना राजप्रतिष्ठा लाभली.

सातवाहन हे ऐतिहासिक कालांतील अखिल महाराष्ट्राचे पहिले राज्यकर्ते होत. विद्या आणि कला यांचे उदार आश्रयदाते म्हणून त्यांची ख्याति होती. त्याचमुळें इ. स. पूर्व २०० पासून इ. स. २५० पर्यंतच्या साडेचारशें वर्षांत प्रतिष्ठानची प्रतिष्ठा सर्वच

क्षेत्रांत कळसास पोंचली होती. सातवाहन कुलांतील हाल नांवाच्या रसिक राजपुरुषानें प्राकृत भाषेंतील सातशें लोकगाथांचें संकलन करून 'गाथासप्तशती' नांवाचा ग्रंथ तयार केला. हा ग्रंथ प्राचीन महाराष्ट्रांतील ग्रामीण लोकजीवनाचें हृद्यंगम दर्शन घडविणारा असून प्राकृत भाषेंतील काव्याचा एक अप्रतिम नमुना आहे. 'बृहत्कथा' या प्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता गुणाढ्य हा आद्य सातवाहनाचा आश्रित होता. गुणाढ्याचा प्रतिष्ठानशीं आलेला हा संबंध महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याच्यामुळें प्राकृत भाषांची प्रतिष्ठा उंचावली आणि त्यांना राजाश्रय लाभला.

असा हा सातवाहन कुलाचा आणि प्रतिष्ठानचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. किंबहुना, प्रतिष्ठानची प्रतिष्ठा या सातवाहनांच्या संबंधानेंच गाजली. जैनांच्या वाङ्मयांत 'पइठाणे नगरे सालीवाहणो राया।' असा हा संबंध वारंवार वर्णिला आहे. हैदराबादच्या पुरातन वस्तुसंशोधन खात्यानें सातवाहनकालीन संस्कृतीचे अनेक अवशेष शोधून काढले आहेत. उत्खननांत मिळालेल्या या पुरातन वस्तु हैदराबादच्या पुरातन वस्तु-संग्रहालयांत ठेवलेल्या असून, प्रेक्षकांना प्रतिष्ठानच्या पुरातन संस्कृतीचा गौरव सांगत आहेत.

सातवाहनांच्या नंतर झालेल्या राज्यकर्त्यांनीं आपल्या राजधान्या पैठणपासून दूरवर नेल्यामुळें पैठणच्या राजवैभवाला उतरती कळा लागली. यादव-काळापर्यंत पैठणची स्थिति पुष्कळच चांगली होती. परंतु पुढें पैठणचें वैभव अगदींच नष्टप्राय झालें असावें. कारण, राजशेखर कवीनें 'प्रबंधकोश' या ग्रंथांत (इ. स. १३४९) पैठणविषयीं असें म्हटलें आहे कीं —

" अधुना तु दक्षिणदेशस्थितं प्रतिष्ठानपुर क्षुल्लकग्रामतुल्य वर्तते ! "
(सध्या दक्षिणदेशातील प्रतिष्ठान नगर हें एखाद्या क्षुल्लक खेडेगावा-सारखें बनलें आहे)

'दक्षिण-काशी' पैठण :

दक्षिणगंगा गोदावरीच्या कांठचें महाक्षेत्र म्हणून पैठण हें दक्षिण-काशी आहेच; पण दुसऱ्याहि एका दृष्टीनें तें 'दक्षिण-काशी' या नांवाला पात्र आहे. काशी हें जसें संस्कृत विद्येचें महापीठ आहे, तसेंच पैठणहि दक्षिणेंतील विशेषतः महाराष्ट्रांतील संस्कृत विद्येचें महापीठ म्हणून प्रसिद्ध आहे. यादव-काळापासून येथील पंडितांच्या परंपरांची माहिती आढळते. व्याकरण आणि धर्मशास्त्र या दोन ज्ञानशाखांच्या अध्ययनांत, अध्यापनांत आणि या शास्त्रावरील ग्रंथलेखनांत पैठणच्या पंडितांनीं एक मह-नीय परंपरा निर्माण केली. येथील धर्मशास्त्रविशारदांचा निर्णय महाराष्ट्राच्या समाजजीवनांत अखेरचा मानला जात असे. हिंदु आचारधर्माचें नियमन करणारा 'निर्णयसिंधु' हा ग्रंथ पैठणच्याच कमलाकर भट्टानें लिहिलेला आहे. संस्कृत व्याकरणावरील एक प्रमाणग्रंथ 'सिद्धान्त-कौमुदी' येथील भट्टोजी दीक्षित ( स. १५८० –१६५० ) नांवाच्या गाजलेल्या पंडितानें रचलेला आहे. छत्र-पतींचें क्षत्रियत्व सिद्ध करून त्यांच्या राज्याभिषेकासाठीं पुढें होणारे गागाभट्टहि पैठणच्याच विख्यात भट्ट घराण्यांतले. या भट्ट घराण्याला काशींत आजहि अग्रपूजेचा मान आहे. भट्टोजी दीक्षितांची परंपरा अजूनहि नांदत असून संस्कृत विद्येच्या संरक्षण-संवर्धनासाठीं त्या परंपरेंतील अनेक पंडित आपलें सारें आयुष्य वेंचीत आहेत.

परंतु दुर्दैव असें कीं, या संस्कृत पंडितांचें धर्मज्ञान केवळ शाब्दिक बनलें. ज्या समाजाच्या धारणेसाठीं धर्मशास्त्राचा उदय

झाला, त्या समाजाच्या अंतिम हिताची करुणा न बाळगतां केवळ शब्दज्ञानाचा अहंकार निर्माण होऊं लागला. या अहंकारापायीं धर्मनियमांचे हेतु विसरले जाऊं लागले आणि ' समाजासाठीं नियम ' ही स्थिति ढळून ' नियमांसाठीं नियम ' अशी विकृत स्थिति निर्माण झाली. या स्थितीला ज्ञानेश्वरांपूर्वी चक्रधर नांवाचा महापुरुष बळी पडला. ज्ञानेश्वरादि कोंवळ्या भावंडांचाहि या वृत्तीनें क्रूर छळवाद मांडला आणि नाथांना तर प्रत्यक्ष त्यांच्या मुलानेंच धिक्कारण्याचा प्रयत्न केला.

पण हा शब्दज्ञानाचा फुंज फार काळ टिकाव धरूं शकला नाहीं. अखेर शब्दज्ञानानें हृदयधर्मापुढें शरणागति पत्करली आणि ज्ञानाला भावभक्तीची जोड देऊन जगणेंच श्रेयस्कर आहे, हें मान्य केलें.

— असें हें महाराष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीचें केंद्र, मराठीचें माहेर, संतांचें कर्मक्षेत्र आणि कवींचें स्फूर्तिस्थान एकदां डोळे भरून पाहावें, असें कुणा महाराष्ट्रीयाला वाटणार नाहीं ?

भग्नावशेषांचा पसारा :

पैठण हें क्षेत्र मोटार-मार्गानें नगरहून चाळीस मैलांवर आणि औरंगाबादहून तीस मैलांवर आहे. ज्या क्षेत्रामागें शेंकडों वर्षांच्या वैभवशाली परंपरा जागत्या आहेत, जिथें विक्रमशाली राजांचे प्रासाद डौलानें उभे होते, जिथें मठ-मंदिरांतून मराठी शारदेचें विलासनृत्य चालू होतें, जिथें महाराष्ट्राची विराट् प्रज्ञा तत्त्वचर्चेचे रंग उधळीत होती आणि जिथें संतांच्या हृदयांतील करुणेची गंगा मानवांचे पाप-ताप क्षाळीत होती, त्या क्षेत्राचें दर्शन आपल्याला घ्यायचें आहे. तिथल्या धुळीनें आपलें अंग माखून घ्यायचें आहे. त्या पुण्यसरितेच्या वाळवंटांत लहान मूल बनून लोळायचें आहे.

गोदावरीच्या पाण्यांत अंग घुसळून आपण गांवांत शिरूं या. गोदावरीला आपल्याशीं कांहीं हितगुज करायचें आहे; हृदय मोकळें करून अंतरींचा ठेवा आपल्या हातीं द्यायचा आहे; पण आपण तिला सांगूं या – “ आई, थांब जरा, आम्ही गांवांत जाऊन येतों, नाथांचें दर्शन घेतों. परत जातांना क्षण-दोन क्षण तुझ्या कुशींत विसावून आणि तुझा 'सांगावो' घेऊन परत फिरूं. ”

पण पैठणांत आपण पाहायचें तरी काय ? गांवांत शिरून रस्त्यानें चालूं लागावें तों सारा भग्नावशेषांचा पसारा. दर एका घरामागें दोन घरें पडलेलीं आहेत. निखळूं लागलेले प्रचंड चौथरे, ढांसळलेल्या रुंद भिंती आणि कलाकुसरीनें नटलेल्या दरवाजांच्या जीर्ण चौकटी असें दृश्य आपल्याला वारंवार दिसतें. या अवशेषांतून नव्यानें उभारलेल्या घरांच्या बांधणींत, घरा-समोरच्या कंपाउंडच्या गडग्यांत आणि रस्त्याच्या कडेला आप-ल्याला असे अनेक पाषाण दिसतील कीं, ज्यांच्या सर्वांगावर पुरातन वैभवाच्या खुणा आहेत. गांवाच्या गाभ्यांतच एका घरवजा पडक्या मंदिरांत शिल्पसौंदर्याचा गर्व बाळगणाऱ्या शेष-शायी आणि नृसिंह मूर्ति आहेत. या दोन नयनमनोहर मूर्ति आणि शंकराचार्य मठांतील भव्य भैरवमूर्ति आपल्या उपेक्षेची साक्ष देत अजूनहि उभ्या आहेत. मूर्ति, लेख आणि कलाकुसर मिरवणाऱ्या पाषाणांची ही अवस्था पाहून मन उदास होतें. तें नाथांचें नगर एखाद्या अनाथ सतीसारखें मूकपणानें हुंदके देत आहे, असा भास होतो. पेशवाईतल्या सावकारांचे भव्य वाडेहि लक्ष्मीला पारखे होऊन गतवैभवाचीं शोकगीतें गातांना ढांसळले आहेत. पेशवाईतल्या वाड्यांची ही स्थिति – मग त्या प्राचीन सातवाहनांचे वाडे कसे उरणार ? परंतु सातवाहनांच्या मुख्य प्रासादाच्या खुणा अजूनहि आहेत. त्या वास्तूच्या प्रचंड आवारांत

आज एक मशीद उभी आहे. नदीतीरावरच्या महालक्ष्मी-मंदिराचीहि अशीच मशीद बनली आहे. ती आपण नंतर पाहूं. मशिदीच्या आजूबाजूला शिल्पसौंदर्यानें नटलेले दगडी खांब छिन्नभिन्न अवस्थेंत अजूनहि पडले आहेत. त्या जड पाषाणांतून "कालाय तस्मै नमः" असा हताश ध्वनि सारखा उमटतो आहे. वाड्याच्या आवारांत विहीर आहे. ती विहीर 'शालिवाहनाची विहीर' म्हणून ओळखली जाते. त्या खोल अंधाऱ्या विहिरीनें युगांची कहाणी आपल्या हृदयांत जतन केली आहे.

महानुभावांची धर्मभूमि :

सातवाहनांच्या काळानंतर पैठणच्या जीवनाशीं ज्याचा जिव्हाळ्याचा संबंध आला, असा सत्पुरुष म्हणजे महानुभाव संप्रदायाचा प्रवर्तक महात्मा चक्रधर. येथील भोगनारायणाच्या मंदिरांत महानुभाव संप्रदायाचा मठ आहे. यादव-काळांत या मंदिराचा आकार-प्राकार खूप मोठा असल्याचे प्राचीन उल्लेख आढळतात. आज त्या भव्यतेचा मागमूसहि नाहीं. काळाच्या जबड्यांत तें पूर्ववैभव नष्ट झालें आहे. आज हेमाडपंती बांधणीचें भोगनारायणाचें मंदिर भग्नावस्थेंत उभें आहे. हा महानुभावांचा मठ 'दत्तात्रेयाचें देऊळ' म्हणूनहि ओळखला जातो.

आज उपेक्षित असलेल्या या ठिकाणीं महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांतील त्या क्रांतिकारी महापुरुषाचें कार्यकेंद्र नांदत होतें. ज्ञानेश्वरांच्या पूर्वी होऊन गेलेला हा सत्पुरुष मूळचा गुजराथचा — भडोचच्या एका प्रधानाचा मुलगा. ऐन तरुण वयांत विराग निर्माण झाल्यामुळें त्यानें माता-पित्यांचा, रूपसुंदर पत्नीचा, कोंवळ्या मुलाचा आणि धनवैभवाचा त्याग केला. शाश्वत सुखाच्या शोधासाठीं, सत्याच्या दर्शनासाठीं, मानवतेच्या

दुःखनिवारणाचा उपाय शोधण्यासाठीं त्यानें सारे पाश तोडले आणि भ्रमन्ती पत्करली. त्याचा हा गृहत्याग भगवान् बुद्धाच्या गृहत्यागाइतकाच करुण-गंभीर आहे. घर सोडल्यावर भटकत भटकत तो ऋद्धिपूर येथें आला. तेथें गुंडम राऊळ नांवाच्या एका सत्पुरुषाचा गुरूपदेश प्राप्त करून त्यानें सालबर्डीच्या डोंगरावर घोर तपश्चर्या केली. या तपांतून त्याला असा साक्षात्कार झाला कीं, सत्य, अहिंसा आणि समता यांच्या आचारांतूनच जगांतील साऱ्या दुःखांचा निरास होईल. या साक्षात्कारानंतर बराच काळ एकान्त भ्रमण करून इ. स. १२६७ च्या सुमारास त्यानें पैठण गांठलें. पैठण हें, महाराष्ट्राची त्या वेळची राजधानी जी देवगिरि तिच्यापासून जवळ असून धर्म-संस्कृतीचें व व्यापार-उद्योगाचें केंद्र असल्यामुळें आपल्या विचारप्रचाराला योग्य स्थान आहे, हें जाणून चक्रधरानें येथेंच आपला महान् विचारयज्ञ आरंभिला.

याच भोगनारायणाच्या मंदिरांत त्यानें दहा महिने निवास केला आणि नागांबिका ऊर्फ बाइसा नांवाच्या स्त्रीला दीक्षा देऊन आपलें एकान्त भ्रमण संपविलें. त्यानें स्वतः संन्यासदीक्षा घेतली, यतिमुनींचा वेष धारण केला आणि आपले अनुभव व विचार यांची पेरणी करण्यासाठीं जीवनाच्या अखेरीपर्यंत मराठी भूमि पायाखालीं घातली. मराठी आणि महाराष्ट्र यांबद्दल त्याच्या मनांत अत्यंत आदरभाव होता. त्यामुळें त्यानें आपल्या उपदेशाचें माध्यम मराठी बनविलें आणि मेघवृष्टीप्रमाणें अखंड विचारदान केलें. पैठण हें त्याच्या कार्याचें केंद्र होतें, त्यामुळें त्याला 'प्रतिष्ठानींचे चांगदेव राऊळ' असें म्हणत.

चांपेगौर गोमटी मूर्ति, मुखावर विराग आणि अनुराग यांचें आगळें सौंदर्य पसरलेलें, निरपेक्ष आणि निःस्पृह वृत्तीची ग्वाही देणारा यतिवेष, हृदयाची पकड घेणारी अमृतमय वाणी


आणि ज्यांच्यांतून आईची माया ओसंडत आहे असे भावमय डोळे – अशी ती चक्रधराची मूर्ति या भूमींत वावरत असेल, तेव्हां पाषाणांतूनहि चैतन्याचे कळे फुलत असतील – जडालाहि संजीवनी लाभत असेल. आजहि आपण डोळे मिटले कीं भोंवतालचें भग्न वातावरण दूर होतें आणि तो संस्कृतांत बंदिस्त झालेलें ज्ञान लोकभाषेंतून विवरणारा, ब्राह्मणांपासून चांडाळांपर्यंत सर्वांना ज्ञानाचा अधिकार देणारा, चिरवंचित स्त्रीजातीला मोक्षाची वाट दाखविणारा, जातिबंधनें उखडूं पाहणारा आणि हृदयशून्य कर्मकांडावर निखारा ठेवणारा क्रांतिकारी महात्मा मनाच्या डोळ्यांपुढें उभा राहतो.

परंतु ती मूर्ति डोळे मिटून पाहतां पाहतांच मन विषण्ण होतें. याच महात्म्याचा धर्मसत्ता आणि राजसत्ता यांनीं हातांत हात घालून शिरच्छेद केला आणि क्रांतीची पहांट होऊन आलेलें त्याचें जीवन अंधारांत दडपलें.

ज्ञानेश्वरांच्या पाऊलखुणा :


चक्रधरांनंतर या भूमीवर आणखी एका महामानवाचीं पावलें उमटलीं. तो महामानव म्हणजे ज्ञानेश्वर. आळंदीच्या ब्राह्मणांनीं संन्याश्याचीं मुलें म्हणून त्यांच्या मुंजी करण्याचें नाकारलें आणि त्यांना पैठणच्या धर्मपीठाची वाट दाखवली. आळंदीपासून पैठणपर्यंतची प्रदीर्घ वाट, वाहनांची सोय नसलेल्या त्या काळांत, या कोंवळ्या पोरांनीं अनवाणी तुडवली. ज्यांच्या चरणस्पर्शानें भूमीला तीर्थरूपता यावी, त्यांनीं पैठणच्या पंडितांकडे शुद्धिपत्राची याचना केली. पंधरा वर्षांच्या आंतल्या वयाचीं तीं कोंवळीं अनाथ मुलें – त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर कुणाहि सहृदय माणसाला मायेचें भरतें यावें! परंतु पैठणच्या पंडितांनीं त्यांना शुद्ध करून घेणें नाकारलें. त्यांचा क्रूर उपहास केला आणि

आपल्या हृदयशून्यतेचें प्रदर्शन घडविलें. परंतु त्या ज्ञानियांच्या राजानें रेड्यामुखीं वेद वदवला — जणूं रेड्या-प्रमाणें जडमूढ झालेल्या महाराष्ट्राच्या हृदयांत चैतन्य ओतलें आणि आपलें स्वयंभू सामर्थ्य सिद्ध केलें.



नागघाट ( नागतीर्थ )


ज्ञानेश्वरांच्या या किमयेचें स्मारक गोदाकांठच्या नागतीर्थावर आहे. हें नागतीर्थ म्हणजे पैठणचा प्रसिद्ध नागघाट. हा अरुंद पायऱ्यांचा असून खूप उतरता आहे. घाटाच्या एका बाजूला वक्षी सावकारानें केलेल्या जीर्णोद्धाराचा शिलालेख आहे आणि दुसऱ्या बाजूला एका बुरजावर रेड्याची कोरीव प्रतिमा आहे. या नागतीर्थाला आजवर अनेक सत्पुरुषांचे पाय लागले असतील. येथें बसून अनेक ग्रंथकारांनीं आपले ग्रंथहि लिहिले आहेत. भागवताचे एक टीकाकार श्रीकृष्णदयार्णव यांनीं आपल्या भागवत टीकेचा कांहीं भाग येथेंच बसून लिहिला आहे.



नागघाटाच्या जीर्णोद्धाराचा शिलालेख

कृष्णवेडे कृष्णदयार्णव :

शेवगांव उतारावर नदीकांठीं कृष्णदयार्णवांचा मठ आहे. नदीच्या प्रवाहापासून सुरक्षितता लाभावी म्हणून उंच पायावर मठाची उभारणी केलेली आहे. पायऱ्या चढून आंत गेल्यावर मधल्या आवारांत कृष्णदयार्णव, त्यांचा शिष्य उत्तमश्लोक व दयार्णवांचा नातू काशीनाथ या तिघांच्या समाध्या दृष्टीस पडतात.



कृष्णदयार्णव, उत्तमश्लोक व काशीनाथ यांच्या समाध्यांचीं वृंदावनें

या मधल्या आवारांतून आंत गेल्यावर दयार्णवांचें नित्यपूजेचें देवघर आहे. या देवघरांतील अंधारांत नंदादीपाच्या मंद प्रकाशांत दयार्णवांच्या नित्यपूजेंतील कृष्णमूर्ति आहे. ही कृष्णमूर्ति म्हणजे मूर्तिशिल्पाचा एक मनोहर नमुना आहे. घोटीव कृष्णपाषाणाची ही कृष्णमूर्ति गरुडवाहन असूनहि नृत्य करीत आहे. मूर्तीच्या उजव्या बाजूला बैल आणि डाव्या बाजूला सवत्स गाय आहे. ही नृत्यमग्न कृष्णमूर्ति आठ हातांची आहे. खालच्या चार हातांपैकीं

उजवीकडील दोन्ही हातांत चक्र व गदा आणि डावीकडील दोन्ही हातांत पद्म व शंख आहेत. त्यावरील दोन हातांनीं मुरलीवादन चाललें आहे. अगदीं वरच्या दोन हातांपैकीं उजवा हात प्रवचनमुद्रेचा असून डावा हात अभयमुद्रेंत आहे. अशी ही उन्मत्त आवेशानें ज्ञानदान करणारी, प्रसन्न होऊन भक्तांना वर देणारी, वेणूच्या मंजुमधुर गीतानें मानवांच्या हृदयाच्या गाभाऱ्यांत प्रेमाचें संगीत निर्माण करणारी आणि आपल्या लीलानृत्यानें या विश्वाचें नाट्य रंगवणारी सर्वांगसुंदर कृष्णमूर्ति पाहिली कीं, त्या मूर्तीच्या पूजकाचें व्यक्तिमत्त्व जाणवल्याशिवाय राहत नाहीं.



कृष्णादयार्णवांच्या पूजेंतील कृष्णमूर्ति

कृष्णदयार्णव हे मूळचे कृष्णाकांठच्या कोपडर्याचे. छत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या वर्षीं ( स. १६७४ ) त्यांचा जन्म झाला. त्यांचें मूळ नांव नरहरि नारायण दिवाकर. समर्थांच्या वाणीनें भारावलेल्या कृष्णाकांठीं नरहरीचें मनहि भक्तीनें भारलें गेलें. मातापित्यांचें छत्र लहानपणींच दूर झाल्यामुळें आणि यवनांच्या आक्रमणानें

कृष्णाकांठ व्यापल्यामुळें पोरका झालेला नरहरि विशीच्या आंतच सहकुटुंब परागंदा झाला. मराठवाड्यांत आंबे-जोगाई येथें गोविंदस्वामी नांवाच्या सत्पुरुषाचा गुरूपदेश मिळाल्यावर नरहरि 'कृष्णदयार्णव' हें नामाभिधान पावला. गुरूबरोबर साऱ्या भारताची तीर्थयात्रा करून आणि गुरूच्या समर्थ मार्गदर्शनाखालीं प्रगाढ अध्ययन पूर्ण करून दयार्णवांनीं आंबें सोडलें आणि पैठणच्या परिसराचा आश्रय घेतला. परंतु दुर्दैव असें कीं, वयाच्या चाळिशीच्या सुमारास त्यांना महाव्याधि झाली. या महाव्याधीच्या यातना सहन करीत असतांनाच एकनाथांचा त्यांना स्वप्नादेश झाला कीं, 'तूं भागवताच्या दशमावर टीका लिही म्हणजे तुझी व्याधि दूर होईल.'

नाथांच्या या स्वप्नादेशाला अनुसरून याच मठांत, याच कृष्णमूर्तीच्या साक्षीनें वयाच्या चौपन्नाव्या वर्षीं दयार्णवांनीं ग्रंथरचनेला आरंभ केला. समोर गोविंद गुरूंसारखे श्रोते-सज्जन हृदयाचे कान करून ऐकत आहेत, दयार्णवांसारखा प्रतिभाशाली पंडित ग्रंथाचें विवरण करीत आहे आणि कृष्णकथेसारखा रसाळ विषय आहे, त्यामुळें त्या क्षणीं वाङ्मयाचें प्रयागतीर्थ तेथें निर्माण झालें असल्यास नवल नाहीं. सतत सोळा वर्षें हें ग्रंथलेखन चालू होतें. दयार्णवांच्या मुखांतून अमृतघन ओसंडत होता आणि उत्तमश्लोक तो शब्दांच्या शिंपल्यांत सांठवीत होता. अशा क्रमानें हा 'हरिवरदा' नांवाचा ४२००० ओव्यांचा महाग्रंथ निर्माण झाला. या ग्रंथांत रसाळ कृष्णकथा आहे, भागवतधर्माच्या अंगोपांगांचें विवेचन आहे, साऱ्या शास्त्रजाताचा धांडोळा घेतलेला आहे आणि जयदेवाच्या अष्टपद्यांसारखें भाषेचें संगीत आहे. जणुं दयार्णवांची सरस्वती अनुप्रासांचीं पैंजणें पायांत बांधून कृष्णमूर्तीपुढें पूजा-नृत्य करीत आहे, असा भास होतो. मठांत इतरहि देवतागण आहे, तसेंच हरिवरदाचें प्रचंड हस्तलिखितहि आहे.

आपण जिज्ञासेनें ग्रंथाचीं पानें उलगडूं लागलों कीं, त्या जीर्ण पोथींतून दयार्णवांचा आत्मा आपणांला विनवूं लागतो —

संतां श्रोतयां लोटांगण। घालूनि हेंचि मागतों दान।
निंदा द्वेष विसर्जून। कृष्णकीर्तन परिसावें॥

पैठणनजीक मुंगी येथें दयार्णवशिष्य सनातनस्वामी यांचा मठ असून तेथें विठ्ठलाच्या गाभाऱ्याशेजारीं सनातन आणि त्यांचा शिष्य परमानंद यांचा समाध्या आहेत. प्राचीन हस्तलिखितांनीं संपन्न अशा या मठाच्या परिसरांत चतुर्भुज विष्णूची एक वैशिष्ट्यपूर्ण मूर्ति आहे.

'राजयोगी' शिवदीन केसरी :

गोदावरीच्या वळणावर उंच ठिकाणीं एक प्रचंड किल्लेवजा मठ आहे. हा मठ प्रसिद्ध नाथपंथी संत शिवदीन केसरी यांचा आहे. दुरून एखाद्या सरदाराच्या पुरातन गढीसारखा दिसणारा हा मठ पैठणच्या प्रसिद्धीचा मोठा वांटेकरी आहे. मठाला मोठी जहागीर असून पैठणच्या वातावरणांत प्रतिष्ठाहि मोठी आहे. उत्सवांत नाथांची पालखी निघाली कीं मिरवणुकींत शिवदीनांचा झेंडा आघाडीवर असतो.

मठाच्या महाद्वारांतून आपण आंत प्रवेश केला कीं बाहेरून दिसणाऱ्या भव्यतेऐवजीं आंत कुबट वातावरण, ओलीनें व्यापलेली जमीन आणि ढासळलेल्या भिंतींवर विसांवलेल्या मोडक्या तुळया असें दृश्य नजरेस पडतें. राजयोगी शिवदीनांची भूमि अशी हीन-दीन झालेली पाहून आपल्या उपेक्षा-वृत्तीचा उबग येतो. ही केवळ मठाच्या प्राकाराचीच स्थिति नाहीं, तर मठांतील देवघराचीहि अशीच दुर्दशा आहे. देवतायनाच्या पूजेसाठीं एके काळीं षोडषोपचार सिद्ध असतील तेंच देवतायन भक्तावांचून निराश्रित होऊन बसलें आहे.

हें दृश्य पाहिलें कीं मठाचा लांबच लांब विस्तार पाहण्यासाठीं मनाची उभारी रहात नाहीं. पडक्या भिंती आणि मोडक्या तुळया पाहून मनांतल्या अपेक्षांचीहि तशीच पड-झड होते आणि आल्या पावलीं आपण मागें फिरतों.

शिवदीन केसरी हे अठराव्या शतकांतील संत. इ. सन १६९८ ते १७७४ असा त्यांचा जीवनकाल आहे. ज्ञानेश्वरांच्या नाथपंथी परंपरेंतील केसरीनाथ नामक सिद्धपुरुषाचे हे शिष्य. यांच्या घराण्याकडे पैठणचें जोसपण होतें. वयाच्या आठव्या वर्षीच यांना केसरीनाथांची दीक्षा लाभली. इ. स. १७२२–२६ या काळांत त्यांनीं गुरूच्या आज्ञेवरून संपूर्ण भारतभर तीर्थयात्रा केली. तीर्थयात्रेहून परतल्यावर या अनुभवसंपन्न आणि ज्ञानसंपन्न सत्पुरुषानें कीर्तन-भजनांच्या द्वारां लोकोद्धाराचें कार्य आरंभिलें आणि जीवनान्तापर्यंत पैठणचा परिसर हरिभक्तीनें भारून टाकण्याचा प्रयत्न केला.

कीर्तनासाठीं यांनीं विपुल पदरचना केली आहे. प्राचीन मराठी पदकारांत शिवदीनांचें स्थान मोठें आहे. अंतरींची तळमळ, व्यापक अनुभव, प्रगाढ अध्ययन, आक्रमक आणि आकर्षक वक्तृत्व, शीघ्र कवित्व या गुणांमुळें पैठणास त्यांचीं कीर्तनें गाजत असत. त्यांच्या कीर्तनांवर खुष होऊन एका सूफी साधूनें त्यांना 'दीन' ('धर्म') ही पदवी दिली होती. या 'दीन' पदवीमुळें मूळचे शिवनाथ शिवदीननाथ बनले. चमत्कारांनीं आणि राजसत्तेच्या आक्रमक आश्रयानें सर्वसाधारण भोळ्या-भाबड्या लोकांना नादीं लावणाऱ्या मुस्लीम धर्मप्रचारकांना शिवदीननाथांसारख्या साधूंच्या कीर्तन-भजनांनीं चांगलाच तडाखा बसत असे.

स्फुट पदांखेरीज शिवदीननाथांनीं 'भक्तिरहस्य', 'विवेकदर्पण', 'ज्ञानप्रदीप' इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत. स्वतःच्या आणि

मठस्थांच्या अध्ययनासाठीं शिवदीनांनीं मठांत प्रचंड हस्तलिखित ग्रंथालयहि उभें केलें होतें. हा त्यांचा वैभवशाली मठ म्हणजे पैठण-मधील एक गाजलेलें विद्यापीठच होतें. आजहि एका अंधाऱ्या खोलींत तो सारा हस्तलिखित ग्रंथसंग्रह जीर्णशीर्ण अवस्थेंत पडलेला आहे. त्या संग्रहांतील पानन् पान आक्रोश करून प्रकाशाची वाट पाहत आहे. त्यांतील अनेक ग्रंथ वेळोवेळीं अनेकांनीं नेले आणि त्यांतले अनेक बेपत्ताहि झाले. महाराष्ट्राचें हें वाग्धन कितीतरी ज्ञात-अज्ञात ठिकाणीं ओलींत कुजत आहे; अंधाऱ्या माळ्यांवर कसरींचें भक्ष्य बनत आहे. या अक्षम्य उपेक्षेच्या गर्तेंतून मराठीचें हें वाग्वैभव वांचवण्यासाठीं आपली लोकायत्त शासनसंस्था, आपलीं विद्यापीठें आणि महाराष्ट्रांतील शेंकडों संतवाङ्मयप्रेमी तळमळीनें पुढें येतील आणि शक्य तितक्या लौकर हें कार्य आटोपतील, तरच कांहीं हातीं लागेल. नाहीं तर हें आपलें बहुमोल धन कराल काळाच्या भक्ष्यस्थानीं पडलेलें पाहण्याखेरीज गत्यंतर नाहीं. एकट्या पैठण क्षेत्रांतच प्राचीन ग्रंथांच्या हस्तलिखितांचे कमींत कमी पांचशें रुमाल आजहि आढळतील. यावरून या ग्रंथसंभाराच्या व्याप्तीची कल्पना येऊं शकेल. पैठणचे सुविद्य पाटील अलीकडे यासाठीं बद्धपरिकर झाले असून त्यांच्या प्रयत्नांतून 'प्रतिष्ठान संशोधन मंडळ' निर्माण झालें आहे. शिवछत्रपतींच्या हस्ताक्षरांतील संपूर्ण पत्र नुकतेंच पैठणास उपलब्ध झालें आहे.

## कीर्तनरत अमृतराय

गांवांतल्या विठ्ठल-मंदिरापासून जवळच अमृतरायांचा मठ आहे. हें मठाचें घर फार जुनें असून आंत अमृतरायांच्या पूजेंतील देवतायन आहे. आंत शिरल्यावर इथेंहि आपल्या सार्वत्रिक उपेक्षेचा प्रत्यय येतो. मठांत अमृतरायांच्या पदांचें एकहि

हस्तलिखित नाहीं. किंबहुना मठस्थांनाहि त्या थोर कीर्तनकारा-विषयीं कांहीं माहिती नाहीं.

अमृतराय ( इ. स. १६९८–१७५३ ) हे प्राचीन मराठींतील अव्वल दर्जाचे पदकार आणि कीर्तनकार. पैठणचे कृष्ण-दयार्णव, शिवदीन केसरी आणि अमृतराय हे तिघेहि सत्पुरुष समकालीन होते. अमृतरायांच्या पदांची गोडी अमृतासारखी आहे. कविवर मोरोपंतांनीं या थोर पदकाराला श्रद्धांजलि वाहतांना म्हटलें आहे,

कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा ?

## ही कसली धर्मनिष्ठा ?

गोदामाईच्या मुंगी उतारावर नदीकांठीं एका लहानशा टेकाडावर एक किल्लेवजा भव्य मशीद दिसते. या मशिदीच्या आवाराची भिंत मजबूत असून तीन बाजूंनीं दरवाजे आणि गोदाप्रवाहाभिमुख गॅलरी आहे. मशिदीचें महाद्वार नगराभिमुख आहे. या मशिदीच्या प्रशस्त पायऱ्या चढून आपण आंत गेलों कीं, फुलांच्या आणि धूपाच्या सुगंधानें नाक कोंदून जातें. तिथला उदास एकान्तहि मनाचा कोंडमारा करूं लागतो. सुगंधाच्या मार्गानें आपण आंत गेलों कीं नदीच्या प्रवाहाकडे तोंड करून मौलानासाहेबाची कबर असल्याचें दृष्टीस पडतें. जवळच त्याची बहीण आणि आई यांच्याहि कबरी आहेत.

कां कुणास ठाऊक, पण कबरीपुढें मस्तक विनम्र होत नाहीं. वास्तविक साधुत्वाला देशकालाच्या, जातिधर्मांच्या मर्यादा नसतात. मुसलमान असला म्हणून काय झालें ? – मौलानासाहेब हाहि एक साधूच होता ना ? – असा प्रश्न एक मन करतें. परंतु त्या संपूर्ण मशिदीचें निरीक्षण केल्यावर, तेथील मंदिराच्या पुरातन

७५०५८

चिन्हांचें दर्शन झाल्यावर मन साऱ्या कटु घटनांचा चित्रपट उलगडूं लागतें. त्या प्राकारांतील महालक्ष्मी, रेणुका आणि विनायक यांच्या मूर्ति डोळ्यांपुढें तरळूं लागतात. तेराव्या शतकांतील तें भव्य हिंदु मंदिर कल्पनेच्या डोळ्यांना भुरळ पाडूं लागतें आणि मंदिराची मशीद केव्हां आणि कशी झाली, हा सारा दुर्दैवी इतिहास आठवूं लागतो.

मुसलमानांचें दक्षिणेंत राजकीय आक्रमण होण्यापूर्वीं सूफी पंथाचे मुस्लीम प्रचारक दक्षिणेंत येऊं लागले. आजच्या ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणें या सूफी साधूंना मुस्लीम राज्यकर्त्यांचा पाठिंबा असे. अल्लाउद्दिन खिलजीच्या दक्षिणेंतील स्वारीनंतर दिल्लीचा निजामुद्दिन अवलिया या कारस्थानी सूफीचा शिष्य मुंतजोद्दिन जर्जरीबक्ष हा सातशें सहकारी बरोबर घेऊन दक्षिणेंत आला. देवगिरीजवळ खुलताबाद येथें त्याचा निवास असे. हिंदूंच्या मंदिरांचा आणि परंपरांचा विध्वंस करण्याच्या त्याच्या 'साधुकार्या'साठीं देवगिरीच्या पराभूत आणि परतंत्र यादवांकडून गडगंज मदत मिळण्याची व्यवस्था दिल्लीहून झाली होती. या जर्जरीबक्षानें आपल्या शेंकडों सहकाऱ्यांच्या साह्यानें साऱ्या महाराष्ट्रभर हें परधर्मविध्वंसक धर्मकार्य चालू ठेवलें. याचाच सहकारी पैठणचा मोईजोद्दीन उर्फ मौलानासाहेब. या मौलानासाहेबापूर्वींहि पैठणचें हें महालक्ष्मी-मंदिर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला होता; परंतु तसा प्रयत्न करणारा अब्दुल लतीफ हा धर्मप्रचारक पैठणकरांच्या प्रतिकारांत मारला गेला. त्याची कबरहि गोदावरीच्या तीरावर अद्याप उभी आहे. यानंतर मौलानासाहेब पैठणास आला आणि त्यानें जणुं अब्दुल लतीफची अपूर्ण इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्या वैभवशाली महालक्ष्मी-मंदिराचा ताबा घेतला. प्रतिकार करणाऱ्या अनेक हिंदूंची त्यानें कत्तल केली आणि त्या

मंदिरांतील तीनहि देवतांच्या मूर्ति उखडून मंदिराचें मशिदींत रूपांतर केलें. या मौलानासाहेबानें कृतकृत्य होऊन याच मशिदींत वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी चिरनिद्रा घेतली.

हा इतिहास मनांत जागा झाल्यावर मन अधिकच अस्वस्थ होतें. आपण सारीं एकाच ईश्वराचीं लेकरें. साऱ्या स्थिरचरांत सामावलेला तो निर्गुण निराकार परमात्मा आपल्या इंद्रियांना कसा गवसणार ? त्याची उपासना आपण दुबळीं माणसें कशीं करणार ? म्हणून तर आपण मंदिरांची नि मूर्तींची उभारणी केली. त्या मूर्तींच्या दर्शनानें आणि पूजनानें आपण त्या अनन्त परमात्म्याची कल्पना करावी, त्याच्या स्मरणानें आपलीं हृदयें धवळावीं आणि अखेर त्याच्या अनन्त स्वरूपाला कवळण्याइतकें आपलें जीवन विस्तारावें, आभाळाएवढें मोठें व्हावें, हा तर या साऱ्या मूर्ति-मंदिरांचा उद्देश. मग तें हिंदूंचें मंदिर असो, ख्रिश्चनांचें चर्च असो अगर मुसलमानांची मशीद असो. ज्या ठिकाणीं मनांतील राग-लोभ दूर व्हावे, द्वेष-मत्सर गळून पडावे, हृदयाच्या गाभ्यांतून सर्वांविषयींचा प्रेमभाव उफाळून यावा, त्याच ठिकाणीं धर्मनिष्ठेच्या नांवाखालीं रक्ताचे पाट वहावेत काय ? परमेश्वर सर्वव्यापी आहे आणि सर्व मानवांचा पालक आहे, तर वेगवेगळ्या धर्मांच्या अनुयायांनीं एकमेकांशीं झुंजावें कशासाठीं ? एकमेकांच्या पवित्र प्रतीकांचा, श्रद्धास्थानांचा विध्वंस करून का धर्मपालन होऊं शकेल ? धर्माचें प्रवर्तन करणारे संत-महात्मे या तथाकथित धर्मनिष्ठांच्या कृत्यांनीं व्यथित होत असतील, त्यांचे आत्मे दुःखानें आक्रोश करीत असतील. नाथांनाहि या परिस्थितीला तोंड द्यावें लागलें होतें. त्यांनीं आपल्या 'हिंदु-तुर्क-संवाद' नांवाच्या एका प्रकरणांत ' खुदाला जुदाई ( भेदभाव ) मंजूर नाहीं ' अशी तुर्का-कडून कबुली घेतली आहे.

हें मंदिर-विध्वंसनाचें आणि त्या जागीं मशिदी उभारण्याचें 'पवित्र' कार्य पुढें सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चाललें होतें. पैठणास या मौलानासाहेबाच्या कबरीशिवाय कोटायी मशीद, कालिका घाटावरील मशीद, ढोलेवेशीजवळील मशीद आणि महल्ले इस्लामची मशीद या मशिदींच्या जागीं तेराव्या शतकांत महालक्ष्मी, कालिका, मूर्धादित्य आणि चक्रपाणि या देवतांचीं मंदिरें उभीं होतीं.


— नकोत त्या कटु आठवणी! आपण एका थोर संताच्या भूमींत वावरत आहोंत. त्याची प्रेरणा फार थोर आहे. त्याच्या हृदयाच्या प्रांगणांत साऱ्या स्थिरचरानें बागडावें, एवढें तें विशाल होतें. त्याच्या स्मृतीच्या सान्निध्यांत आपण आतां तरी या खुळ्या भेदभावनांवर मात करायला हृदयानें समर्थ होऊं. द्वेषानें ग्रासलेल्या भेदभावनेलाच धर्मनिष्ठा मानणाऱ्या इतरांनाहि जाग आणण्याचा प्रयत्न करूं. हिंदुस्थानबाहेरच्या प्राचीन सूफी साधूंच्या थोर आदर्शांची त्यांना आठवण देऊं आणि विश्वधर्माकडे वाटचाल करणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या समन्वयकारी प्रवाहांत त्यांना सहयोगी करण्याचा प्रयत्न करूं.

एका जनार्दनी :

पण या सहयोगाची प्रेरणा कुठें आहे? ही प्रेरणा देणाऱ्या नाथांचें दर्शन अजून राहिलेंच आहे. येथील भक्तिसाम्राज्याच्या त्या एकछत्री सम्राटाला प्रणाम करणें अजून राहिलेंच आहे. हें नाथांचें दर्शन द्विविध आहे — जिथें नाथांचें सारें जीवन व्यतीत झालें, त्या स्थळाचें आणि जिथें नाथ चिरनिद्रा घेत आहेत, त्या स्थळाचें.

प्रथम आपण गांवांतल्या नाथांच्या राहत्या घरीं जाऊं. नाथांच्या घराचेंच मंदिरांत रूपांतर झालें आहे. या घराचें देवघर

म्हणजेच मंदिराचा गाभारा. स्वभाविकच आहे. भक्तांचें हृदय हेंच ज्याचें निवासस्थान त्याला वेगळ्या मंदिराची आवश्यकताच कशी भासावी ? नाथांच्या मूळच्या वाड्याचा जीर्णोद्धारानें कायाकल्प झाला असला तरी महाद्वार आणि भिंती त्या वेळच्याच आहेत. गाभाऱ्यापुढचे दोन्ही खांबहि त्या वेळचेच आहेत. आणि जिथें श्रीखंड्याच्या रूपानें भगवान् श्रीकृष्ण गंगेच्या कावडी ओतीत असे तो रांजणहि त्या वेळचाच आहे.



नाथाचा रांजण

गाभाऱ्यांत उच्चासनावर अनेक देवमूर्ति आहेत. त्या मूर्तींच्या समुदायांत आपल्या डोळ्यांची धणी पुरवितो तो नाथांच्या पूजेंतला बाळकृष्ण. याला ' विजयी विठ्ठल ' असेंहि म्हणतात. वीतभर उंचीच्या या पंचरसी धातुमूर्तीचें ध्यान कांहीं आगळेंच आहे. उजवा हात लोण्याचा गोळा चाटून कटीवर उताणा ठेवलेला, डाव्या कटिबद्ध हातांत शंख धरलेला, पायीं वाळे, हातीं कडीतोडे, पाठीवर शिदोरी; काखेला झोळी, गळ्यांत रत्नहार, भाळीं टिळा आणि मस्तकावर शिवलिंगाच्या आकाराचा मुगुट. नाथांच्या ध्यानींमनीं रंगलेलें हेंच तें गोपाळरूप. जणुं हें रूप नाथांच्या सांगातीं या प्रशस्त वाड्यांत वागडत असावें, आपल्या लाडक्या

भक्तांशीं सुखसंवाद करीत असावें; आपल्या इवल्या इवल्या हातांनीं नाथांना दहीकाला भरवीत असावें. नाथहि या बाळकृष्णाबरोबर



नाथांच्या पूजेतील कृष्णमूर्ति

कधीं सौंगडी बनून गायींमागें धांवत असतील; कधीं गोपी बनून त्याच्या वेणूच्या नादानें देहभान विसरत असतील, कधीं यशोदामाता बनून या अवखळ बाळाला उखळाशीं बांधीत असतील, कधीं हा लटका राग विसरून, गायी चारायला गेलेल्या भुकेल्या कृष्णासाठीं तळमळत असतील. याच तन्मयतेंत त्यांच्या मुखांतून शब्द बाहेर पडत असतील —

क्षुधित वनीं गोविंद ।
अहो बाई, क्षुधित वनीं गोविंद ।
रवितनयेतटीं शिशुसह साग्रज
चारित गोधन-वृन्द ॥

नाथ या रूपानें वेडावले, त्याचें कारणहि तसेंच आहे —

शरण एका जनार्दनी । कैवल्याचा मोक्षदानी ॥
गायी, गोप, गोपीबाळा । मेळविले आपुलेपणीं ॥

याच वाड्यांत इ. स. १५३२ मध्यें नाथांचा जन्म झाला. संत भानुदासांपासून विठ्ठलभक्तीचा वारसा चालविणाऱ्या कुळांत

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५२५४
५०

नाथ जन्मास आले. त्यांचे आई-वडील लहानपणींच वारले. आजा-आजींनीं त्यांचा प्रतिपाळ केला. त्यांचे आजोबा चक्रपाणि हेहि एक विद्वान् आणि भक्तिपरायण असल्यामुळें नाथांच्या मनावर लहानपणापासूनच भक्तीचे आणि विद्येचे संस्कार झाले. या वास्तूंतच ते बाल एकनाथ कुशाग्र बुद्धीनें ज्ञानाच्या ओंजळी भराभर प्राशीत असतील आणि भक्तिकथांचा मेवा खात असतील. या संस्कारांमुळें त्यांच्या बालमनांत ईश्वरदर्शनाची व गुरुबोधाची ओढ निर्माण झाली. या ओढीमुळेंच ते अवघ्या बाराव्या वर्षी घर सोडून देवगिरीस गेले आणि तेथें जनार्दन स्वामींच्या पायाशीं बसून त्यांनीं ईश्वरभक्तीचे पाठ घेतले. आपल्या अनन्यसाधारण गुरुभक्तीनें त्यांनीं गुरूचें सर्वस्व जिंकलें आणि आपलें सर्वस्व गुरु-चरणीं वाहिलें. गुरु-शिष्यांच्या एकरूपतेचा डंका त्यांनीं पुढें अखेर पर्यंत ‘ एकाजनार्दनी ’ या एकरूप नांवानें गाजविला.

भागवतमार्ग अति सोपारा :

गुरुबोध प्राप्त करून आणि भारतभर तीर्थयात्रा करून नाथ वयाच्या पंचविसाव्या वर्षी घरीं आले आणि गृहस्थाश्रम स्वीकारून त्यांनीं भावभक्तीचा संसार थाटला. त्यांची पत्नी गिरिजाबाई भक्तीच्या प्रवासांतहि त्यांची सहधर्मचारिणी बनली. असा हा भक्तीनें रंगलेला आणि ज्ञानानें समृद्ध झालेला जगावेगळा संसार नाथांनीं याच वाड्यांत चाळीस वर्षे अनुभवला.

गाभाऱ्यापुढच्या दोन खांबांपैकीं डाव्या हातच्या खांबाला टेकून नाथ प्रवचनास बसत. आपला जीवनभरचा आनंदमय अनुभव ते येथूनच आल्या-गेल्या भाविकांना लुटीत असत. या खांबा-जवळ आल्यावर आपण वर्तमानकाळ विसरतों आणि शतकांचीं पावलें टाकीत आपलें मन नाथांच्या काळांत वावरूं लागतें.

समोर हृदयाचीं कवाडें उघडून जनसमुदाय बसला आहे आणि नाथ येथून प्रकाशाचें महादान करीत आहेत, जडमूढांना भक्तीची संजीवनी देत आहेत. एण्यांचीं हृदयें धवळीत आहेत आणि दीनदलितांना दिलासा देतांना आईहूनहि हळवे बनत आहेत. या हळव्या मायेंतूनच –

‘ पोहणियाहूनि पायउतारा
भागवतधर्म अति सोपारा !

त्यांनीं स्त्री-शूद्रांना सांगितला. ‘ सर्वांभूतीं भगवंत ’ भरलेला आहे, हा ‘गाळीव’ अनुभव त्यांनीं स्वतः घेतला असल्यामुळें ‘ जनीं जनार्दन ’ पाहायची दृष्टि त्यांनीं सर्वांना दिली आणि भूतमात्रावर प्रेम करण्यानेंच ईश्वर प्रसन्न होतो, असें स्वानुभवानें सांगितलें. परंतु हा अनुभव घेण्यासाठीं अहंकाराचा कंद समूळ उपटून टाकला पाहिजे, षड्विकारांवर पाषाण घातला पाहिजे.

जेथ अभिमान समूळ तुटे । तेथ चिन्मात्र पहाट फुटे ॥

या चिन्मय पहाटेनंतर आत्मा परमात्म्याशीं एकरूप होतो आणि सारें अंतर्बाह्य प्रकाशानें उजळून निघतें –

मन रामीं रंगलें, अवघें मनचि राम झालें,
सबाह्य अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें
चित्तचि हरपलें, अवघें चैतन्य जाहलें,
देखतां देखता अवघें विश्व मावळलें !

यासाठीं घर-दार सोडावें लागत नाहीं, गुहागव्हरांचा आश्रय घ्यावा लागत नाहीं, भगवीं वस्त्रें परिधान करावीं लागत नाहींत, तपानें कायेचें काष्ठ करावें लागत नाहीं. याला हवी आहे केवळ हृदयाची शुद्धि. ही शुद्धि प्राप्त झाली कीं कुठेंहि न शोधतां तो भक्तीचा भुकेला पांडुरंग आपण होऊन हृदयांत विराजमान होतो

आणि मग जीव आनंदाच्या महासागरांत तरंगूं लागतो. त्या आनंदसागरांत साऱ्या भेदांच्या भिंती विरून जातात आणि उरतें केवळ विश्वाला कवळणारें प्रेम !

जगा लावावें सत्पथीं :

कीर्तनाच्या महाघोषानें जगाचीं सर्व दुःखें दूर करावीं आणि अवघें 'विश्वचि हरिखें भरलें' असें दृश्य पाहावें, ही नाथांची अंतरींची इच्छा. कारण —

जगा लावावें सत्पथीं। हेचि साधूचीं पैं कृति ॥

साधुत्वाचा हा आदर्श त्यांनीं आपल्या जीवनांत उत्कृष्टपणें आचरला. मानवनिर्मित कृत्रिम भेदांचीं कुंपणें त्यांनीं उखडून टाकलीं आणि सर्वभूतीं समभाव दाखविला. रणरणत्या उन्हांत तहानेनें तडफडणाऱ्या गाढवाला त्यांनीं काशीहून वाहून आणलेलें गंगेचें पाणी पाजलें; गोदेच्या वाळवंटांत भर दुपारीं कासावीस झालेल्या महाराच्या पोराला कडेवर घेऊन त्याच्या आईकडे पोंचविलें; ब्राह्मण-भोजनासाठीं तयार केलेलें श्राद्धान्न भुकेलेल्या महारांना खाऊं घातलें; वेश्याव्यवसाय करणाऱ्या पतिता स्त्रीविषयींहि तिरस्कार न बाळगतां तिचें हृदयपरिवर्तन घडविलें; स्वतः महाराच्या घरीं जेवायला गेले — अशा एक ना दोन, शेंकडों घटनांतून त्यांनीं विषमतेवर निखारा ठेवला आणि त्यासाठीं कांहीं कर्मठांचा नि दांभिकांचा विरोध सहन करून अनेकांना सन्मार्गाला लावलें.

वैष्णव सेवा अत्यंत कठिण
तेथें जाती नाहीं गा प्रमाण
न म्हणावा शूद्र ब्राह्मण
भक्तिप्राधान्य भावार्थें

असा स्पष्ट निर्णय त्यांनीं दिला आहे. 'जाती उत्तम भक्तिहीन। तो वैष्णव नव्हे जाण!' असेंहि त्यांनीं बजावलें आहे.

बाहेरच नाथ :

चाळीस-बेचाळीस वर्षें असें धन्य जीवन अनुभवून, अनेकांचीं सांकडीं फेडून आणि भूतमात्रांत अनन्ताचीं रुपडीं पाहून नाथांनीं शके १५२१ च्या फाल्गुन वद्य षष्ठीला जगाचा निरोप घेतला. इतकें कृतार्थ जीवन क्वचितच कोणाच्या वांट्याला येत असेल. शांति जणुं त्यांची बरोबरी बनली होती, मुक्तीनें जणुं त्यांच्याशीं स्वयंवर केलें होतें, आनंद जणुं त्यांचा स्वच्छेनें मांडलिक बनला होता. हा एकनाथ जणुं साऱ्या विश्वाशीं एकाकार बनला होता. अशा अवस्थेंत शरीर उभें काय आणि पडलें काय, एकच!

नाथांनीं जिथें चिरविश्रांति घेतली, तें समाधिमंदिर गांवाबाहेर नदीच्या कडेला वाळवंटाला लागूनच आहे. हें समाधिमंदिर वृक्षांनीं वेढलें आहे. प्रशस्त असून भोंवतीं मोकळा प्रदक्षिणामार्ग आहे. चौफेर ओवऱ्या आहेत. आंत-बाहेर सर्वत्र नाथांच्या हृदयासारखी स्वच्छता आहे. मंदिराच्या गाभाऱ्यांत नाथांच्या पादुका आहेत. त्या पादुकांत एकाजनार्दनांच्या रूपानें भक्त, गुरु आणि ईश्वर ही त्रिमूर्ति एकवटली आहे. समईच्या मंद प्रकाशांत



नाथांचें समाधिमंदिर

ते नाथांचे पाय न्याहाळतांना आणि त्यांचें 'पायवणी' पितांना आपल्यालाहि क्षणैक आनंदसमाधि लागते. त्या पुण्य पादुकांपुढें माथा विनम्र होतो आणि मन त्या अनाथनाथाला विनवूं लागतें –

तुझ्या पावन स्मृतीनें
माझा उजळू दे भाव,
आणि तुझ्या वाटेवर
हातीं धरुनि चालव !

नाथषष्ठी :

नाथांची स्मृति जागवणारी नाथषष्ठी (फाल्गुन वद्य ६) गेलीं साडेतीनशें वर्षे गाजत आहे. या दिवसाचें महिमान पंचविध आहे. याच दिवशीं जनार्दनस्वामींचा जन्म झाला, त्यांना दत्तदर्शन झालें आणि त्यांचें निर्याण घडलें. नाथांना जनार्दनस्वामींचा अनुग्रह झाला तो याच दिवशीं आणि अखेर नाथांनीं महासमाधि पत्करली तीहि याच दिवशीं. त्यामुळें हा दिवस उभ्या महाराष्ट्रांत स्मरणीय मानला जातो. या निमित्तानें पैठणला दीड-दोन लाख वारकरी आणि भाविक जन जमतात. गोदामाईचें विस्तीर्ण वाळवंटहि त्या समुदायापुढें फिकें पडतें. समाधिमंदिरासमोर ज्या विस्तीर्ण प्रांगणांत प्रसादाच्या नि अबीर-कुंकवाच्या दुकानांची दाटी होते.

हा उत्सव द्वितीयेला सुरू होऊन अष्टमीला संपतो. द्वितीयेला नाथांघरचा रांजण उघडून त्याची पूजा करतात. गोदाजलाच्या घागरी भरून लोक रांजणांत ओतूं लागतात. नाथांचा पणतू केशवस्वामी यानें लिहिलेल्या नाथचरित्राचा पाठ सुरू होतो. पंचमीला देवाची अक्षत निघते. षष्ठीला मध्यान्हाच्या वेळीं वाळवंटांतून दिंडी निघून मागच्या दारानें गांवाबाहेरच्या समाधिमंदिरांत येते. नंतर ज्या अभंगावर नाथ स्वतः निरूपण करीत, त्याच अभंगावर निरूपण होतें.

अवघेंचि, त्रैलोक्य आनंदचि आता।
चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें ॥
माय जगन्नाथ, बाप जगन्नाथ।
अनाथाचा नाथ जनार्दन।
एका जनार्दनी एकपणें उभा।
चैतन्याची शोभा शोभतसे ॥

त्यानंतर वाड्यांत ब्राह्मणांची पाद्यपूजा होऊन लाह्यांचा कूट आणि पीठ यांचा महाप्रसाद होतो. सप्तमीच्या रात्रीं छबिना निघतो आणि अष्टमीस सूर्यास्ताच्या वेळीं बाहेरच्या नाथांसमोर गोपाळ-काला होऊन उत्सव संपतो. अष्टमीच्या रात्रीं दिंडी कृष्णकमला-तीर्थावर राहते आणि तेथें वाङ्मयपूजा करण्यासाठीं आलेल्या हरिदास पुराणिकांचीं कीर्तनें-प्रवचनें होतात. उत्सवसमाप्तीनंतर परत फिरणाऱ्या वारकऱ्यांना आणि भक्त-भाविकांना नाथ जणूं निरोप देतात —

एका जनार्दनाची विनती,
येऊनि मनुष्यदेहाप्रती,
करोनिया भगवद्‌भक्ती,
निजात्मप्राप्ती साधावी।

गोदामाईचा संदेश :

जिथें नाथांनीं जनीं जनार्दन अनुभवला, दीनदलितांना वाट दाखविण्यासाठीं भागवताची प्रथम पंचाध्यायी रचली, रामराज्याची गुढी उभारणारी रामकथा गायली आणि अभंग-पदें-भारुडें रचून कीर्तनांतून भक्तीची गंगा निर्माण केली, त्या पैठणचा निरोप घेतांना मन पुनःपुन: तिथेंच रेंगाळतें; त्याच त्याच आठवणी घोळवीत राहतें. गोदामाई वाट सोडीत नाहीं. तिनें सतत

चाळीस वर्षं त्रिकाळ स्नान करणाऱ्या नाथांचें हृदय लुटलें आहे. नाथ तिच्याइतके कुणालाच परिचित नसतील. त्यांच्या अंगाच्या स्पर्शानें तिचा जलराशि 'तीर्थरूप' बनला आहे. नाथांचें जीवनहि तिच्या जीवनासारखेंच होतें — तापशामक आणि पापक्षालक. तीं दोन जीवनें इथें एकरूप बनून वाहत आहेत — अशींच अनंत काळपर्यंत वाहत राहतील.

भगवद्भाव सर्वां भूतीं,
या नांव माझी मुख्य भक्ती ।

हा गोदामाईचा चिरंतन संदेश आहे.

REFBK-0015050

## एकनाथांची आरती


आरती एकनाथा । महाराजा समर्था ।
त्रिभुवनीं तूंचि थोर । जगद्गुरु जगन्नाथा ॥ १ ॥
एकनाथ नाम सार । वेदशास्त्रांचें गुज ।
संसारदुःख नासे । महामंत्राचें बीज ॥ २ ॥
एकनाथ नाम घेतां । सुख वाटलें चित्ता ।
अनंत गोपाळ दासा । धणी न पुरे गातां ॥ ३ ॥

* * *

सांस्कृतिक महाराष्ट्रदर्शन-माला : सहा पुस्तकें : रु. ४

१. मातापूरची जगन्माता (श्रीक्षेत्र माहूर), २. योगेश्वरीचें माहेर (आंबें जोगाई), ३. दक्षिणद्वार देवगिरी (दौलताबाद), ४. बारावें ज्योतिर्लिंग (श्रीघृष्णेश्वर वेरूळ), ५. नागेशं दारुकावने (औंढ्या नागनाथ), ६. परल्यां वैजनाथं च (परळी वैजनाथ).

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि., मुंबई २




पंढरपूर—पांडुरंग, सज्जनगड – रामदासस्वामी, आळंदी - ज्ञानेश्वर, पैठण – एकनाथ, जेजुरी – खंडोबा, देहू – तुकाराम, त्र्यंबकेश्वर-नाशिक - श्रीराम, चिंचवड – मोरया गोसावी, कोल्हापूर – महालक्ष्मी, औदुंबर-नरसोबाची वाडी दत्तात्रय, तुळजापूर—भवानी, नेवासें—मोहिनीराज, ज्ञानेश्वर, कवळें—शांतादुर्गा, मंगेश—शंकर, भीमाशंकर - ज्योतिर्लिंग; परशुराम परशुराम, शिखर-शिंगणापूर – शिवाजी, हरिहरेश्वर – पेशवे गाणगापूर – नरसिंह सरस्वती, माहूर - दत्त, देवी, आंबे जोगाई– देवी; औंढचा नागनाथ - ज्योतिर्लिंग, परळी वैजनाथ - ज्योतिर्लिंग, वेरूळ लेणी, ज्योतिर्लिंग, नांदेड गोदावरी बीड कंकालेश्वर, रामटेक सीता-राम, सालबर्डी यात्रा, अमरावती - अंबादेवी, मुक्तागिरी जैन-क्षेत्र चांदा महाकाली, शेगाव गजानन महाराज, कौंडिण्यपूर – पांडुरंग कळम्ब - चिंतामणी, दक्षिणद्वार देवगिरी दौलताबाद